महा मेट्रो

PUNE METRO

# बालदिन २०२२ साजरा : २२०० पेक्ष अधिक विद्यार्थ्यांनी पुणे मेट्रोची केली सफर


**शालेय विद्यार्थ्यांनी पुणे मेट्रोमध्ये सफर करून बालदिन २०२२ साजरा केला**

**<u>दिनांक: १४/११/२०२२</u>**



पुणे: शहरातील ११ शाळा आणि २२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी पुणे मेट्रोमध्ये सफर करून त्यांचा बालदिन २०२२ खास बनवला. कोविड महामारीमुळे 2 वर्षांच्या कालावधीनंतर, यावर्षीचा बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुले पुणे मेट्रोच्या

अनुभवाबद्दल खूप उत्सुक होती आणि त्यापैकी बहुतेकांनी पहिल्यांदाच मेट्रोचा प्रवास केला. बालदिन साजरा करण्यासाठी अनेक उपक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. जसे की चित्रकला स्पर्धा, विविध खेळ आणि प्रश्नमंजुषा. त्यानंतर विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. रीच 1 मधील पीसीएमसी मेट्रो स्टेशन, संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशन, फुगेवाडी मेट्रो स्टेशन आणि रीच 2 मधील नळस्टॉप मेट्रो स्टेशन आणि गरवारे कॉलेज मेट्रो स्टेशन येथे आयोजित दिवसभराच्या उत्सवात २२०० हून अधिक मुले, मुली आणि दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.







पुणे मेट्रोने या वर्षीच्या बालदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना मेट्रो प्रवासाचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा यासाठी मेट्रो सफारीचे आयोजन केले असून त्यांना सार्वजनिक वाहतूक, सुरक्षितता आणि मेट्रो प्रवासातील आराम या गोष्टीचे महत्व सांगण्याचा प्रयत्न केला . 'सीइंग इज बिलीव्हिंग' या विश्वासातून मेट्रो प्रवासाच्या अनुभवामुळे या विद्यार्थ्यांच्या मनात सार्वजनिक वाहतुकीबद्दल उत्सुकता आणि आवड निर्माण होईल. पुणे मेट्रोच्या वनाझ ते गरवारे कॉलेज आणि पीसीएमसी ते स्वारगेट या मार्गांवर, अनेक शालेय विद्यार्थी नियमितपणे मेट्रोने प्रवास करतात आणि उर्वरित स्थानके लोकांसाठी खुली झाल्यावर ही संख्या वाढण्याची अपेक्षा आहे.




बालदिनानिमित्त, सीसी इंजिनिअरिंग पुणेने पुणे मेट्रो स्थानकांवर मेट्रोने प्रवास करण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना ५०० बाल साहित्याची पुस्तके भेट म्हणून दिली. विशेष मुलांसाठी लायन्स क्लब आणि रोटरी क्लबने मेट्रो राइड प्रायोजित केली.पुणे मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाची



माहिती शालेय विद्यार्थ्यांना दिली आणि विद्यार्थ्यांना अधिक जाणून घेण्याची उत्सुकता होती. शहरातील नवीन सार्वजनिक वाहतुकीबद्दल अधिक जाणून घेण्याची त्यांची उत्सुकता आणि उत्साह उल्लेखनीय होता. प्रोजेक्ट ब्रीफ नंतर अनेक खेळ आणि प्रश्नमंजुषा घेण्यात आल्या आणि त्यात अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. पुणे मेट्रोने ड्रॉईंग स्पर्धेतील विजेत्यांना योग्यरित्या बक्षीस दिले. ज्या विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरांच्या प्रश्नांची अचूक उत्तरे दिली त्यांना पुणे मेट्रो तर्फे स्मृतीचिन्ह देण्यात आले. अनेक शालेय विद्यार्थ्यांनी सांगितले की ते नियमितपणे वर्तमानपत्रे आणि पुणे मेट्रोच्या सोशल मीडिया पृष्ठांवरून पुणे मेट्रोचे अपडेट्स तपासतात.

सेंट क्रिस्पिन स्कूलच्या इयत्ता 8 व्या वर्गात शिकत असलेल्या नीलमने तिचा अनुभव, “मला मेट्रो राईडचा खूप आनंद झाला, हा खूप आरामदायी प्रवास होता. मला हा अनुभव घेण्याची संधी दिल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार" अश्या शब्दात सांगितला.

सेंट हेलनास शाळेतील 10वीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले की, “मी गरवारे कॉलेज मेट्रो स्टेशनवर आहे जिथे आम्हाला प्रकल्पाविषयी माहिती देण्यात आली होती आणि मी ही माहिती माझ्या मित्रांना आणि कुटुंबियांना नक्कीच सांगेन. माझ्यासाठी तो एक अद्भुत अनुभव होता. आणि, मी लोकांना पुणे मेट्रोचा वापर करण्याचे आवाहन करतो कारण यामुळे आम्हाला रस्त्यावर गर्दी होऊ नये आणि शहरातील प्रदूषण कमी होण्यास मदत होईल” .



या वेळी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित म्हणाले, "पुणे मेट्रोचे व्यावसायिक ऑपरेशन सुरू झाल्यापासून हा पहिलाच बालदिन साजरा होत आहे. मला तुम्हाला कळविण्यात आनंद होत आहे की, पुणे मेट्रोचा वापर अनेक शालेय विद्यार्थी नियमितपणे घर ते शाळा आणि परतीच्या प्रवासासाठी करतात. येत्या काही महिन्यांत आम्ही लवकरच पुणे मेट्रोचे उर्वरित भाग उघडणार आहोत ज्यामुळे मुलांना शाळांसाठी मेट्रोचा वापर करण्यास मदत होईल."

